## हु तात्माराजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

## राज्यशास्त्र विभाग

1. **राज्यशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन व स्वागत समारंभ**

हु तात्माराजगुरू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागात शनिवार दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ०९:३० वा. मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे व कला विभागाचे उप-प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांच्या हस्ते राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले. त्याचबरोबर द्वितीय वर्षातील राज्यशास्त्र विभाग नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्वागत समारंभास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच राज्यशास्त्रविभागात दिवतीय आणि तृतीय वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मा. प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला.तसेच विभागातील माजी विद्यार्थी कु.निखिल जगताप व कु. सुरज मा. उप- प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे गुण तसेच कठोर परिश्रम घेण्याचे तयारी ठेवली पाहिजे असे सागितले. जगात अशक्य असे काही नाही, जर आपण मनाशी ठरवले तर कुठलेही काम करू शकतो फक्त याला प्रामाणिकतेची जोड हवी असे प्रतिपादन त्यांनी केले.

2. **"संविधान गौरव दिन सप्ताह".**

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये "संविधान गौरव दिन सप्ताह" करण्यात आला आहे. सोमवार दिनांक 21 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर या कालावधीमध्ये महाविद्यालयीन सर्व विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार दिनांक 25.11.2022 रोजी भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी 9:30 वाजता स्पर्धेसाठी सुरुवात झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. भित्तिपत्रक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी विविध रंगीबिरंगी चित्रांचे तसेच संविधान संविधानातील विविध कलम हक्क घटना दुरुस्ती अतिशय चांगल्या प्रकारे कार्डशिट पेपरवर लिहिले. त्याचबरोबर रेखाटन केलेले होते. या स्पर्धेत 85 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची माहिती मिळाली.

26 नोव्हेंबर हा दिवस "संविधान गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो हा दिवस आपल्या महाविद्यालयात देखील उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष आदरणीय श्री. नानासाहेब टाकळकर, ज्येष्ठ संचालक श्री.बाळासाहेब

सांडभोर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे आणि महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. सुरुवातीला सर्व अतिथींच्या हस्ते संविधान पत्रिकेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना संविधान पत्रिकेचे वाटप करून संविधान पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच संविधान गौरव दिन सप्ताहाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील सर्व यश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे सन्माननीय अतिथीच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले.

3. **विशेष शैक्षणिक सहलीचे आयोजन** - १९ जानेवारी २०२३ रोजी राज्यशास्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील आदर्श स्थानिक स्वराज्य संस्थांचा समग्र अभ्यास व्हावा म्हणून राळेगणसिद्धी - हिवरेबाजार (ता. पारनेर, जि. अहमदनगर) या ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. एकूण ४२ विद्यार्थी ह्या अभ्यास दौऱ्यात सहभागी झाले होते. राळेगणसिद्धी येथे समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांचे ग्रामविकासासंदर्भातील विचार श्रवण केले तर हिवरे बाजार गावी आदर्श सरपंच पोपटराव पवार यांनी त्यांच्या गावाची आदर्श गावाची कशी ओळख निर्माण झाली ह्याची सुसंवादातून माहिती देत विद्यार्थ्यांना ग्रामविकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.
4. **महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागात महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान संपन्न झाले. गुरुवार दि. १३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत सदरचा हा कार्यक्रम पार पडला. पाबळ येथील श्री. पद्ममणी जैन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रेहानआरा बेग या मान्यवर वक्त्या म्हणून व्याख्यानासाठी उपस्थित होत्या. श्री. पद्ममणी जैन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रेहानआरा बेग , हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सर , उपप्राचार्य / कला शाखा प्रमुख डॉ. संजय शिंदे सर , राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. संदीप देशमुख सर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महापुरुषांचे विचार हाच समाजाच्या उन्नतीचा मूलमंत्र असून भारतीय संविधानातील तत्त्वांना अभिप्रेत अशी मानवी वर्तवणूक असायला हवी असा विचार व्याख्यात्या डॉ. बेग यांनी मांडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास सोनावणे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. संदीप देशमुख यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. प्रभाकर जगताप सर यांनी केले. या कार्यक्रमास ८६

विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सांगतेच्या वेळी सर्वांना भारतीय संविधानाची शपथ देण्यात आली.

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय,राजगुरुनगर

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.




**"संविधान गौरव दिन सप्ताह"**




**राज्यशास्त्र अभ्यास मंडळ उद्‌घाटन व स्वागत समारंभ**




**विशेष शैक्षणिक सहलीचे आयोजन**